# स्वादुपिंडदाह आणि होमिओपॅथिक उपचार

कुठलीही पोटदुखी किंवा पोटशूळ ही एक गूढ, गंभीर स्वरूपाची आणि डॉक्टरांचे कौशल्य पणाला लावून अचूक रोगनिदान करण्याची मोठी परीक्षाच असते. कारण पोट म्हटले की, वेगवेगळ्या अवयवांचा सुसूत्र पद्धतीने सहकार्य, समन्वय साधणाऱ्या महत्त्वाच्या अवयवांचा प्रभाग. प्रत्येक अवयव महत्त्वाचा. यकृत, जठर, स्वादुपिंड, प्लीहा, किडनी, लहान व मोठे आतडे, मूत्राशय, पित्ताशय, पुरुषांमधील प्रोस्टेट ग्रंथी, तर स्त्रियांमधील बीजांडकोश आणि गर्भाची पिशवी यामुळे कुठल्याही अवयवाला दाह झाला किंवा इजा झाली की पोटशूळ चालू होतो.

Pancreatitis म्हणजे स्वादुपिंडदाह. स्वादुपिंड हा महत्त्वाचा अवयव उदराच्या पाठीमागे असतो व प्लीहा, यकृत आणि लहान आतड्याने आच्छादलेला असतो. स्वादुपिंड हे अंतःस्रावी ग्रंथी आणि पचनसंस्थांचा भाग म्हणून अशी दुहेरी कार्य करते. स्वादुपिंडाद्वारे Insulin, Glucagon, Somatostatin इ. संप्रेरके स्रवली जातात. ज्याद्वारे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित केले जाते. तसेच अन्नपाचकरसही तयार केला जातो. या अन्नपाचकरसामध्ये जे विकर असतात, त्याद्वारे मेद, प्रथिने आणि कार्बोदकांचे सूक्ष्म अन्नघटकांत विभाजन केले जाते. तसेच लहान आतड्यांतील आवश्यक असणारे अन्नघटक शोषून घेतले जातात.

**प्रकार** :- याचे दोन प्रकार होतात - १. Acute Pancreatitis अचानक स्वादुपिंडाला दाह होऊन वेदना सुरू होणे. पित्ताशयातील खडे हे या प्रकाराचे प्रमुख कारण आहे. पोटात वरच्या भागात वेदना चालू होतात, ज्या हळूहळू तीव्र होतात. कधी कधी ह्या वेदना पाठीकडे पसरतात. वेदनांबरोबरच मळमळ व उलट्या सुरू होतात. शरीरातील पाणी व नत्र कमी कमी होत जाते. रक्तातील अमायलेज आणि लायपेजचे प्रमाण तिपटीने वाढते. या विकरांमुळे फुफ्फुसआवरणाभेवती दाह निर्माण होऊन पाणी तयार होऊ लागते. जर हा दाह वाढत गेला तर हळूहळू किडनी निकामी होऊन रुग्ण अत्यवस्थ होतो. अशा वेळी पोटाची नुकतीच कुठली शस्त्रक्रिया झाली आहे का? आनुवंशिकता हे एक कारण आहे किंवा मद्यपानाची सवय याची चौकशी करावी लागते.



होमिओपॅथी चिकित्सा व उपचार

डॉ. अमरसिंह निकम

२. Chroric Pancreatitis स्वादुपिंडाला सतत दाह होऊन त्याच्या पेशी जाड व घट्ट होतात. परिणामी स्वादुपिंडात रचनात्मक बदल होऊ लागतात. स्वादुपिंडाच्या पेशींचा ऱ्हास होऊ लागतो किंवा स्वादुपिंडातील नलिकेत अडथळा निर्माण होतो. परिणामी रचनात्मक बदलांबरोबरच स्वादुपिंडाचे कार्य बिघडते. परिणामी मधुमेह, स्वादुपिंडाभोवती सिस्ट तयार होणे किंवा स्वादुपिंडाचा कॅन्सर होऊ शकतो. मद्यपान हे या प्रकाराचे प्रमुख कारण आहे. सततच्या स्वादुपिंडामुळे वेदनांबरोबरच जुलाब होऊ लागतात, वजन घटते, अशक्तपणा जाणवतो.

**कारणे** :-१. पित्ताशयातील खडे पित्ताद्वारे स्वादुपिंडनलिकेत येऊन अडथळा निर्माण करतात. त्यामुळे स्वादुपिंडदाह निर्माण होतो. २. धूम्रपान आणि मद्यपानाचे सेवन. ३. पोटाला झालेली इजा किंवा शस्त्रक्रिया. ४. पोटातील ट्युमर. ५. मेदाचे अतिप्रमाणात सेवन. ६. रक्तातील कॅल्शियमचे अतिप्रमाण. ७. जनुकीय आजार जसे की, Cystic Fibrosis ८. मधुमेहाच्या उपचारांसाठी वापरण्यात येणारी औषधे, स्टिरॉइड इ. ९. स्वायत्तप्रतिकारक्षमतेतील बिघाड. १०. पॅराथयरॉइड संप्रेरकाचे अतिप्रमाण. ११. हिपॅटायटिस बी, गालगुंड, नागीण, तापज्वर वैगेरे वैगेरे असे आजार तयार करणाऱ्या विषाणूंचा प्रादुर्भाव यांमुळे स्वादुपिंडदाह उद्भवतो.

**लक्षणे** :- १. पोटात वरच्या बाजूला, डाव्या भागात तीव्र वेदना होणे, या वेदना पाठीच्या कण्याकडे पसरणे. २. अतितीव्र स्वरूपाची वेदना, कधीकधी ह्या वेदनेमुळे नाडीचे ठोके दुप्पट वेगाने वाढतात. घाम फुटतो. कधीकधी उलट्या होतात. रक्तदाब कमी होऊन पेशंट शॉकमध्ये जाऊ शकतो.

**निदान** :- या आजाराचे निदान रक्तातील अमायलेज, लायपेज या विकरांचे प्रमाण, पोटाची सोनोग्राफी व सी.टी स्कॅन करून केले जाते.

**दुष्परिणाम** : १. स्वादुपिंडदाहमुळे शरीरातील पाणी आणि नत्र खूपच कमी कमी होत जाते. रक्तक्षय होतो. उदरपोकळीत पाणी जमा होते. अशीच अवस्था राहिली तर किडनीचे कार्य निकामी होते. २. सततच्या दाहमुळे स्वादुपिंडातील पेशी नष्ट होत जातात. ३. स्वादुपिंडाला फुगवटा निर्माण होतो किंवा अब्सेस तयार होते. ४. फुफ्फुसआवरणामध्ये पाणी जमा होणे. ५. रक्तातील कॅल्शिअमचे प्रमाण कमी होते आणि साखरेचे प्रमाण वाढते. ६. जुनाट स्वादुपिंडदाहामुळे मधुमेह होतो. हे सगळे दुष्परिणाम लक्षात घेता आणि प्रचंड वेदनांमुळे या आजारावर ताबडतोब उपचारांची गरज असते.

**केस** –

ही एक तेरा वर्षांच्या मुलीची केस आहे, जिला अधूनअधून पोटात दुखल्यामुळे सतत रुग्णालयात भरती करावे लागत होते. तिला जुनाट स्वादुपिंडदाह असल्याचे निदान डॉक्टरांनी केले. सततच्या त्रासामुळे आणि रुग्णालयात भरती व्हावे लागत असल्यामुळे ती आणि तिच्या घरचे त्रासलेले होते. शेवटी तिला डॉक्टरांनी स्वादुपिंडाची शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला होता. वाढलेले रक्तातील अमायलेज आणि लायपेज आणि सोनोग्राफी रिपोर्ट घेऊन ते माझ्याकडे आले. सोनोग्राफीमध्ये पित्ताशयात खडे आणि स्वादुपिंड व यकृताला सूज दिसून आली.

**तक्रारी** :- १. पोटदुखी ५ वर्षांपासून - अचानक पोटात डाव्या बाजूला वेदना होणे. वेदना वाढल्यानंतर उलट्या होणे. वेदना चालू झाल्यावर पाणीसुद्धा प्यायला त्रास होणे. जेवताना, चालताना, पोटात दुखणे. आराम केल्यावर, पोट धरून बसल्यावर, पाय दुमडून बसल्यावर बरे वाटणे.

विशेष माहिती - १. खाण्यात, दुधाची आणि दुग्धजन्य पदार्थांची तसेच गोडाची आवड. २. जिभेवर पिवळट आवरण. ३. सतत तहान लागणे. ४. थंड प्रकृती.

**स्वभावः**–

**तुमचा स्वभाव कसा आहे?**

तिच्या वडिलांनी सांगितले की आम्ही विभक्त कुटुंबात राहतो. ती बोलकी आहे, पण ती कोणामध्ये पटकन मिसळत नाही. तिला अंधाराची भीती वाटते. तशी ती लाजाळू आहे. तिला नृत्याची आवड आहे. पण, तिला स्टेज डेअरिंग नाहीये. तिचं जास्त करून तिच्या आईशी पटतं. राग आला तर ती एकटी जाऊन शांत बसते. सांगितल्यावर सर्व गोष्टी ऐकते. सांगितलेली सगळी पथ्ये पाळते. तिच्या लहान भावाबरोबर तिची भांडणं होतात. तिला चिडवलेले सहन होत नाही.

**तिला कशाची भीती वाटते?**

तिला अंधाराची, भुताची, एकटे राहण्याची भीती वाटते.

**संपूर्ण व्यक्तिमत्त्व** - १. अचानक तक्रारी सुरू होणे. २. ठसठसल्यासारख्या वेदना. ३. दाबल्यावर व पुढे झुकल्यावर बरे वाटणे. ४. पोटात डाव्या बाजूला वेदना होणे. ५. पाणी पिल्यानंतर उलट्या होणे. ६. लाजाळू स्वभाव. ७. अंधाराची, एकटं राहण्याची भीती. ८. जीवनाविषयीची समज तिच्यामध्ये खूप लवकर दिसून आलेली होती. ९. थंड प्रकृती.

**प्रतिसाद** – तिला मी रुग्णालयात भरती करून होमिओपॅथिक औषध चालू केले. ॲडमिट केल्यावर तिच्या तीव्र यातना आणि वेदना हळूहळू झाल्या. तिच्या उलट्या थांबल्या आणि ती अन्नपाणी घेऊ लागली. तिचा ताप कमी झाला. नाडीचे ठोके पूर्ववत झाले. तिच्या चेहऱ्यावरील वेदनांच्या छटा नाहीशा झाल्या आणि त्या जागी स्मितहास्य उमलू लागले. एका गंभीर आजारातून मुलीची मुक्तता झाली.

सारे कुटुंब आनंदाश्रूत वाहून गेले. कुठल्याही वेदनाशामक गोळ्या आणि प्रतिजैविक इंजेक्शनचा वापर न करता शस्त्रक्रियेचा आधार न घेता होमिओपॅथीने तिला रोगमुक्त केले.

**पत्ता - आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल ॲण्ड फिलिंग सेंटर, तपोवन रोड, पिंपरी गाव, पुणे-१७. संपर्क - ०२०-६९३३७०८०, २७४१२५४९, २७४१२१९७**




| विक्रांत आढाव

**व्यायाम आणि आहार हे जरी चांगल्या आरोग्याचे मुख्य आधारस्तंभ असले, तरी इतर ही अनेक घटकांचा यामध्ये अंतर्भाव करणे आवश्यक बनले आहे. यामध्ये 'मसाज' हा देखील महत्वाचा बनला आहे. सध्याच्या ताणतणावग्रस्त जीवनशैलीमध्ये तर मसाजचे अनन्यसाधारण महत्व आहे.**

## आठवड्यातून एकदा मसाज आवश्यकच



आठवड्यातून एकदा शरीरास 'मसाज' करणे आरोग्यास अत्यंत हितकारक असते. मात्र हा मसाज अनुभवी व तज्ञ व्यक्ती कडून करणे नक्कीच आवश्यक. अर्धवट माहिती असलेल्या व्यक्तींकडुन मसाज करुन घेतल्यास शरीरास अपाय होण्याचा संभव नाकारता येत नाही. सध्या अनेक ठिकाणी मसाज पार्लरचे पेव फुटले आहे. मात्र या मसाज पार्लरच्या तज्ञांची व अनुभवाची खातरजमा करणे आवश्यक बनले आहे. योग्य पध्दतीने केलेला मसाज शरीरास ताजेतवाने करत असतो. तसेच रक्ताभिसरण सुरळीत करित मनाला उल्हासित करतो. यामुळेच आठवड्याचा शेवट व सुटीचा योग साधत शरिरास केलेला मसाज हा पुढील आठवड्याची उर्जा देवून जातो.

## जय आनंद ग्रुपच्या रक्तदान शिबिरास प्रतिसाद

**पुणे : प्रतिनिधी**

राष्ट्रसंत आचार्य सम्राट यांची जयंती आणि स्वातंत्र्यदिनानिमित्त जय आनंद ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास युवकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. पुणे सातारा रोडवरील आदिनाथ जैनस्थानक भवन आणि बिबवेवाडी येथील जैन स्थानक येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २५० युवक आणि युवतींनी सहभाग घेतला. या शिबिराचे उद्घाटन चाँदकरवभाई दगडूजी नवलखा यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरास नगरसेवक मनीषा चोरबेले, पुना मर्चंट चेंबरचे अध्यक्ष प्रवीण चोरबेले पुणे शहर व्यापारी महासंघाचे माजी अध्यक्ष पोपटलाल ओस्तवाल, गौतम नाबरिया, राम बांगड हे उपस्थित होते, अशी माहिती जय आनंद ग्रुपचे कार्याध्यक्ष दिलीप धोका यांनी दिली.

## शेतकऱ्याच्या हृदयाला मिळाली संजीवनी

**पुणे : प्रतिनिधी**

शेतकरी बाळू कारके (वय ४०, रा. मुळशी) यांच्यावर रुबी हॉलमध्ये सवलतीच्या दरात हृदयाच्या झडपेची यशस्वी शस्त्रक्रिया झाल्याने त्यांना एक नवीन जीवन मिळाले आहे. अत्यवस्थ असतानादेखील त्यांच्यावर हृदयाच्या झडपेची यशस्वी शस्त्रक्रिया झाल्याने त्यांची प्रकृती आता ठणठणीत आहे.

कारके यांची यापूर्वी दोनवेळा हृदयाची डावी झडप (प्रोस्थेटिक व्हॉल्व) शस्त्रक्रियेद्वारे बदलण्यात आली होती. मात्र ती पुन्हा खराब झाल्यामुळे कारके यांची शस्त्रक्रिया परत करणे आवश्यक होते. वयाच्या सतराव्या वर्षापासून त्यांच्यावर या प्रकारच्या झडपा बदलण्यात आल्या होत्या. कारके कुटुंबीयांना आशेचा किरण दाखवला तो डॉ. समीर भाटे यांनी. कारके यांना रुबी हॉल क्लिनिकमध्ये आणले तेव्हा ते व्हेंटिलेटरवर होते. त्यांच्या हृदयाची झडप इतकी निकामी झाली होती आणि फुफ्फुसांमध्ये पाणी साचल्यामुळे त्यांना श्वास घेणेही अशक्य झाले होते. ही हृदयावरील शस्त्रक्रिया होती त्यामुळे ती अधिकच धोकादायक ठरणारी होती, कारण आधीच्या शस्त्रक्रियांमुळे हृदय छातीच्या हाडांशी चिकटले गेले होते. डॉ. सुधीर भाटे आणि डॉ. स्वप्नील फुलादी यांच्या मदतीने तब्बल सात तासांच्या शस्त्रक्रियेनंतर खराब झालेली झडप बदलून त्या जागी थर्ड जनरेशन टिश्यू व्हॉल्व बसविली आणि ही शस्त्रक्रिया यशस्वी ठरली.


याबाबत बोलताना रुबी हॉल क्लिनिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी बोमी भोट म्हणाले, दरवर्षी हॉस्पिटल गरजू रुग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दरांमध्ये वैद्यकीय उपचार पुरविते. गेल्यावर्षी आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील कुटुंबांच्या चेहऱ्यावर स्मित उमटविण्यासाठी हॉस्पिटलने एकूण २० कोटी रुपये खर्च केले आहेत.



## आडवे शब्द

१. आश्रय, निवारा; जलदेवता
४. अगतिक (हिंदी); अमिताभचा एक चित्रपट
७. कमी वजनाचा
९. डोक्यास झालेली जखम
११. ढवळाढवळ; बेचैनी
१२. पेशव्यांचा अंमल असलेला काळ
१३. स्त्रीचे पिशाच, जखीण
१४. लक्ष्मी, शोभा, कमला
१५. कपाळभर लावलेले कुंकू
१६. वडिलांची बहीण, मावळण
१७. संत तुकाराम महाराजांचे जन्मठिकाण
१७ अ 'तर'चा विरोधक शब्द
१८. ताबुताचा सण; मुस्लीम वर्षाचा पहिला महिना
१९. खुबी, मर्म
२०. गर्दभ; ओझे वाहणारा प्राणी
२१. प्रतापगडापासून जवळच असलेला इतिहासप्रसिद्ध प्रांत
२२. नांगर (हिंदी)
२३. राखण, सांभाळ, रक्षा
२४. कलमी नसलेला सर्वसाधारण आंबा
२६. शरीर, देह, अंग
२७. दुभत्या जनावरांची ओटी; कासोटा
२८. उत्तीर्ण (इंग्रजी)
३०. काकुळतीला येऊ न केलेली विनवणी
३१. 'पायथा'च्या विरुद्धार्थी शब्द
३२. व्याधी, विकार, आजार
३३. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचा तालुका
३४. चारित्र्य, देहस्वभाव
३५. सामानसुमान, कोणतेही जिन्नस
३७. केस रंगवण्याचे रसायन, डाय
३९. निभाव, टिकाव
४०. बावळट, वेडसर
४१. अस्थी, हाडूक
४२. ग्लानी, शीण, दुर्बलता
४४. मुलामा, लिंपण
४६. चलाख, चुणचुणीत, तजेलदार
४८. नशीब, भाग्य (इंग्रजी)
४९. मोठा चाकू
५२. मटणाचे कालवण; पृथ्वी
५४. तमाशाचा शौकीन
५६. किसणीने खवलेला चुरा
५७. '** ** *** बरं हाय का, काल काय ऐकलं ते...'
६१. अगम्य, गूढ न कळणारे
६३. बिहारमधील एक बौद्ध तीर्थस्थान

मंगळवार, १८ ऑगस्ट २०१५ पुण्यनगरी **शब्दनगरी**



६४. ऱ्हास, पतन; एक रोग
६५. वेंधळा, खुळचट
६७. निश्चय, प्रतिज्ञा; पैज; परंतु
६८. दंतमंजन
७१. मनावरील आघात, धक्का (हिंदी)
७२. नर्गिसचा पहिला हिंदी चित्रपट
७३. व्हेल माशाचे मराठी नाव
७४. नृत्य करणारा, डान्सर

२१. कुलदीप पवार- पद्मा चव्हाण- सरला येवलेकर-धुमाळ यांचा चित्रपट
२५. जव, सातू
२६. तसे होवो (असा आशीर्वाद)
२७. राजर्षी शाहू महाराज यांचे जन्मठिकाण
२९. जोराची कळ, तिडीक
३०. एक मराठी चित्रपट- '**** निघाले'
३१. सूर्यास्ताची पश्चिम दिशा
३२. नगद ऐवज, रोख, कॅश
३४. शिजलेला तांदळाचा दाणा; गार
३६. दुनियेचे सततचे व्यवहार, रहाटगाडगे
३८. रोड टॅक्स
४१. वस्त्र विणण्याचे हाताने चालवण्याचे यंत्र
४३. समुद्रमंथनावेळी रवीचा दोर म्हणून वापरला गेलेला सर्प
४५. दुसऱ्याच्या शरीरात प्रवेशणे म्हणजे- **** प्रवेश
४७. प्रथा, चाल, पद्धत
४८. ग्रामीण भाषेत 'लग्न'
५०. ढीग, चळत, खच
५१. क्षुधा, खाण्याची इच्छा
५३. दुधवरची मलई
५५. विनासायास, लीलया
५८. 'कॉम्प्युटर'ला मराठी शब्द
५९. टेहळणी, गुप्त नजर
६०. एक म्हण- 'नाव मोठं, *** खोटं'
६२. मानहानी, मानखंडना
६५. खेळात 'आऊ ट' होणे; हिंदीत 'नंतर'
६६. कठीण, कडक, निबर
६७. प्रतिष्ठा, इभ्रत, वजन, विश्वास
६८. दरवाजा, द्वार
६९. चोपडी, नोटबुक
७०. तांबडी माती, गेरू
७१. खरगोश

## उभे शब्द

१. 'फिरत्या चाकावरती देशी मातीला ***, विठ्ठला तू वेडा...'
२. 'निकाह' चित्रपटाची नायिका- *** आगा
३. पोपट, तोता, राघू
४. जखमेवर लावावयाचे स्निग्ध औषध
५. शेजारी शेजारी, बहुतांश
६. घोड्यावरुन मारलेला फेरफटका
७. जयपूर येथील एक प्राचीन राजवाडा
८. खूप, जास्त (ग्रामीण)
९. लत, दुर्गुण; झाडांचा बुंधा
१०. वेदना, सणक
१३. गोविंदा-नीलम-जॉनी लिव्हर यांचा चित्रपट; वध
१५ अ दूरदर्शन केंद्राचे मुंबईतील ठिकाण
१६. आंब्याचा रस
१७. 'नको **** अंत असा पाहू। प्राण हा सर्वथा...'
१८. पीठ मळताना त्यास लावलेले तेल
१९. बारदान, तरट
२०. समुद्राच्या लाटेचा आवाज

### कालच्या शब्दनगरीचे उत्तर



## स्वाइन फ्लूने एकाचा मृत्यू

**मृत्यूचा आकडा ९४ नऊ रुग्ण अत्यवस्थ**

**पुणे : प्रतिनिधी**

स्वाइन फ्लूने आज पुन्हा एका ५१ वर्षीय रुग्णाचा शहरातील एका खासगी हॉस्पिटलमध्ये बळी घेतला. या वर्षी स्वाइन फ्लूने मृत्यू होणाऱ्यांची संख्या ९४ इतकी झाली आहे. तर आणखी नऊ रुग्ण अत्यवस्थ आहेत, अशी माहिती पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिली.

स्वाइन फ्लूच्या रु ग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या शहरातील विविध रुग्णालयात १५ रु ग्ण उपचार घेत आहेत. त्यापैकी ९ रुग्ण अत्यवस्थ असून त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आलेले आहे. तसेच सहा रुग्ण हे साधारण वॉर्डमध्ये उपचार घेत आहेत. तर उपचार घेऊन बऱ्या झालेल्या रुग्णाला डिस्चार्ज देण्यात आले आहे. आज रुग्णांच्या केलेल्या पाहणीत दोन रुग्ण पॉझिटिव्ह सापडलेले आहेत. आज ११४१ रुग्णांचे विविध रुग्णालयात स्क्रिनिंग करण्यात आले. त्यापैकी स्वाइन फ्लू सारखी लक्षणे असलेल्या ९४ रुग्णांना टॅमिफ्लू हे औषध देण्यात आले तसेच २४ रुग्णांचे स्वॅब (घशातील द्रव) तपासणीसाठी पाठवण्यात आलेले आहे, अशी माहिती पुणे महानगरपालिकेचे आरोग्यप्रमुख डॉ. एस. टी. परदेशी आणि सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र ठाकूर यांनी दिली.

## वारज्यातील बारटक्के दवाखान्याच्या काचा फोडल्या

**पुणे : प्रतिनिधी**

वारज्यातील कै. अरविंद बारटक्के रुग्णायलयातील मागील बाजूला असलेल्या खिडक्याच्या काचा फोडल्याची घटना आज सकाळी उघडकीस आली. या ठिकाणी सुरक्षा रक्षक नियुक्त असताना हा प्रकार झाल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. याप्रकरणी वारजे - माळवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. हे रुग्णालय शनिवार व रविवारी सुट्टी असल्याने बंद होते. सोमवारी सकाळी ९ च्या सुमारास रुग्णालय उघडले असता यातील वैद्यकीय अधिकारी कक्ष, सिस्टर रूम, ड्रेसिंग रूम, स्टोअर रुम या चार खोल्यांच्या मागच्या बाजूला उघडणाऱ्या खिडक्यांच्या काचा फोडण्यात आल्याचे दिसून आले. ड्रेसर महेश शरणाप्पा जामगे (वय २९ रा. कोथरूड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या ठिकाणी रात्रीच्या वेळेस १० वाजेपर्यंतच सुरक्षा व्यवस्था असते. त्यानंतर कधीतरीच सुरक्षा रक्षक दिसतो. याबाबत महापालिकेचे मुख्य सुरक्षा अधिकारी पवार यांच्याशी संपर्क साधला असता, तो होऊ शकला नाही. या ठिकाणी योग्य रक्षकांची नियुक्ती करण्यात यावी व कामात कसूर करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी माजी नगरसेवक किरण बारटक्के यांनी केली आहे.